RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक १] बुधवार, जानेवारी २१, २०२६ / माघ १, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक १

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.— महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . **पृष्ठे** १-४

दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सतिश वाघोले,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

१९६० चा १०.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील,— १९६० चा १०.

(अ) खंड (चार) मधील, " मुंबई बाल अधिनियम, १९४८" या मजकुराऐवजी, "बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; १९४८ चा मुंबई ७१. २०१६ चा २.

(ब) खंड (चार) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(चार-अ) "बाल कल्याण समिती" याचा अर्थ, बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याच्या कलम २७ अन्वये घटित केलेली बाल कल्याण समिती, असा आहे ;"; २०१६ चा २.

(क) खंड (सहा) वगळण्यात येईल.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील, "किंवा बाल न्यायालय," हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ४ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (३) मधील, "दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ६१" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम ५८" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ५ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मधील, पोट-कलम (९) वगळण्यात येईल.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ८ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, पोट-कलम (४) मधील, "दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ४८८" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम १४४" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ९ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये,—

(१) पोट-कलम (२) मधील,—

(अ) "न्यायालयाने त्यास बाल न्यायालयाकडे" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "व्यवस्था करावी" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"न्यायालय त्याला बाल कल्याण समितीकडे पाठविल, जी बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याच्या तरतुदीनुसार मुलांच्या संबंधात कार्यवाही करील.". २०१६ चा २.

(ब) परंतुकातील, "संसर्गजन्य महारोगाने पीडित नसलेला किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) पोट-कलम (३) मधील, "दंड प्रक्रिया संहिता, १८९८, कलम ६१" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम ५८" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम २६ मध्ये,— सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २६ ची सुधारणा.

(अ) समासटीपेमधील, "महारोगी व" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (१) मध्ये, "किंवा महारोगी" हा मजकूर ज्या दोन्ही ठिकाणी आला आहे आणि "किंवा कुष्ठालयांत" हा मजकूर, वगळण्यात येईल ;

(क) पोट-कलम (२) मधील, "किंवा तो महारोगापासून बरा झाला आहे" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ड) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

२०१७ चा १०. "(३) मानसिक आरोग्य देखभाल अधिनियम, २०१७ याच्या तरतुदी, पोट-कलम (१) अन्वये मनोरुग्णालयात अटकावून ठेवलेल्या भिकाऱ्यास ज्या कालावधीसाठी अटकावून ठेवण्याचा आदेश दिला होता तो कालावधी समाप्त झाल्यानंतर, अशा प्रत्येक भिकाऱ्यास लागू होतील ; आणि त्या पोट-कलमान्वये भिकाऱ्यास ज्या मुदतीत मनोरुग्णालयात अटकावून ठेवलेले असेल ती मुदत, त्यास ज्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला असता त्या मुदतीचा भाग म्हणून गणण्यात येईल :

परंतु, जेव्हा मनोविकलतेमुळे भिकाऱ्यास ताबडतोब हलविणे आवश्यक असेल त्याबाबतीत, ज्या संस्थेत भिकाऱ्यास अटकावून ठेवण्यात आलेले असेल त्या संस्थेच्या प्राधिकाऱ्यांना, ज्या मुदतीत राज्य शासनाचा आदेश मिळविता येऊ शकेल अशा मुदतीपर्यंत, भिकाऱ्यास मनोरुग्णालयाच्या स्वाधीन करण्याकरिता ताबडतोब आदेश मिळविण्यासाठी, उक्त अधिनियमान्वये अधिकारिता असणाऱ्या न्यायालयाकडे अर्ज करण्याची मुभा असेल.".

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये,— सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३० ची सुधारणा.

१८९० चा ११. १९६० चा ५९. (अ) पोट-कलम (२) मधील, "प्राण्यांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९०, कलम ६ब" या मजकुराऐवजी "प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० याच्या कलम ३५" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

१८९० चा ११. १९६० चा ५९. (ब) पोट-कलम (३) मधील, "प्राण्यांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९०, कलम १५" या मजकुराऐवजी "प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० याच्या कलम ३८" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

१८९० चा ११. १९६० चा ५९. (क) पोट-कलम (४) मधील, "प्राण्यांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८९०, कलम १५" या मजकुराऐवजी "प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० याच्या कलम ३८" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

१८६० चा ४५. **१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३२ मधील, "भारतीय दंड संहितेच्या" या मजकुराऐवजी, सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३२ ची सुधारणा.

२०२३ चा ४५. "भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३३ ची सुधारणा.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मधील, "दंड प्रक्रिया संहिता, १८९८" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३४ ची सुधारणा.

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मधील, "दंड प्रक्रिया संहिता, १८९८" या मजकुराऐवजी, "भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. २०२३ चा ४६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.